REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# राजा राममोहन रॉय यांचे सामाजिक व धार्मिक विचार आणि कार्य



**प्रा. रसाळ दशरथ किसन**
सहाय्यक पाध्यापक,
इतिहास विभाग लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

**प्रस्तावना:**

राजा राममोहन रॉय यांचे भारतीय समाजाच्या आधुनिकीकरणाततथा सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींत अत्यंत महत्वाचे योगदान आहे. त्यांना भारतीय प्रबोधनाचेजनक, भारतीय प्रबोधनाचा प्रभात तारा म्हणून संबोधले जाते.तेआधुनिक भारताचे जनक आणि नवयुगाचे अग्रदूत मानले जातात सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळीच्या दृष्टीने विचार करता ते सुधारकांचे अध्यात्मिक पिता होते. इतिहासकार रामचंद्र गुहा यांच्या मते राजा राममोहन रॉय हे उपखंडात आधुनिकतेने पारंपरिक सामाजिक संरचनेसमोर उभ्या केलेल्या आव्हानांचा गंभीरपणे विचार करणारे पहिलेच गृहस्थ होते.ते संस्कृत, फारसी, फ्रेंच, लॅटिन, ग्रीक, हिब्रू आदी भाषा जाणणारे विद्वान असल्याने आणि याविविध भाषांच्या अध्ययनामुळे विचारांत परिवर्तन झाले. त्यांनी प्रामुख्याने धर्म सुधारणेकडे आपले लक्षकेंद्रित केले. ज्या काळात पाश्चात्य शिक्षणाने प्रभावित झालेला बंगालचा युवावर्ग ख्रिश्चन धर्माकडे आकृष्ट होत होता. त्या काळात रॉय हिंदू धर्माचे संरक्षक म्हणून समोर आले. त्यांनी पूर्व-पश्चिम ह्यांच्या विचारात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला

राजा राममोहन रॉय हे महान समाजसुधारक होते. विशेषतः स्त्रियांची स्थिती सुधारण्याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. सती प्रथेला तीव्र विरोध करूनसन. १८१८ मध्ये आंदोलनास सुरवात केली. सन. १८१८ मध्ये 'विधवांना पतीच्या चितेवर जिवंत जाळण्याच्या प्रथेचे समर्थक आणि विरोधक यांच्यातील चर्चा' नावाचे बंगाली भाषेतील सती प्रथेविरुद्ध धर्माची मीमांसा करणारे पत्रक त्यांनी काढले. त्याच वर्षी त्याचे वरील शीर्षकाखालीइंग्रजी भाषांतर केले. 'सती प्रथा ही हिंदू धर्माने सांगितलेले धार्मिक कर्तव्य नाही आणि तिला हिंदू धार्मिक ग्रंथांनी मान्यता दिलेली नाही' त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. आपल्या भूमिकेच्या समर्थनात ते प्राचीन धर्म ग्रंथांचे प्रमाण देताना दिसतात. त्यांच्या मते कोणतेहीशास्त्र अथवा जगातील कोणत्याही लोकांच्या सारासार विचाराने पाहिलेतरी हे सर्व खूनचहोते. म्हणून तत्कालीन धर्माचे ठेकेदार, सर्वसामान्य नागरिकांना तर्कशक्ती, नैतिकता, मानवीयता, दयाभावचे आवाहन करताना ते दिसतात.त्यांनी स्मशानभूमींची यात्रा काढून विधवांच्या नातेवाईकांना समजावून सती रोखण्याचा प्रयत्न केला. अनेक समविचारी लोकांच्या मदतीनेअनेक गट निर्माण करून देखरेख सुरु केली. पुढे सन. १८२९ मध्ये लॉर्ड विलियम बेंटिंकनेसती प्रथा विरोधी कायदा संमत करवून घेतला

रॉय हे महिलांना पैतृक संपत्तीतील वाटा मिळावा या मताचे होते. याला प्रमाण देताना प्राचीन स्मृतिग्रंथात मुलींना निदान मुलांच्या चतुर्थांशाइतका हिस्सा मिळावा असे प्रतिपादले असल्याचे त्यांनी जनतेपुढे मांडले. यासोबतच त्यांनी विधवा विवाहाचे समर्थन केले. ते बहुविवाह विरोधी होते. मात्या-पित्यांनी कन्याविक्रय करू नये असे आवाहन त्यांनी केले. ते स्त्री शिक्षणाचे मोठे समर्थक होते. त्याचप्रमाणे जाती व्यवस्थेचा अंत करून स्वतंत्रता, समानता आणि बंधुतेच्या आधारावर लोकतांत्रिक समाजाची स्थापना करायला हवी असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या मते,जातीभेद गुलामीचे मुख्य कारण होय. एकतेच्या अभावीच आपण दास्यत्वच्या साखळीत बांधलेले असून, निदान निदान राजकीय हित आणि सामाजिक सुख यांसाठी तरी धर्मात काही बदल होणे आवश्यक आहे. त्यांनी सन. १८२७बुद्धधर्मानुयायी पंडित

मृत्युंजयाचार्य यांच्या 'वज्रसूची' या संस्कृत ग्रंथाचे भाषांतर करून जातीभेद मोडण्याच्या चळवळीचीपूर्वतयारी तयार केली. त्यांनी जातिप्रथेच्या उन्मुलनसाठीमहानिर्वाणतंत्रात वर्णित शैव विवाहाचे स्वरूपस्वीकारण्याचे सांगितले.

राजा राममोहन रॉय हे महान धर्मसुधारक होते. त्यांनी धर्मसुधारणा करीत असताना वेदांतग्रंथांचा आधार घेतला. मात्र त्यांनी वेद किंवा इतर कोणत्याही ग्रंथांना ईश्वरनिर्मित पर्यायाने प्रामादरहित मानले नाही. रॉय बहुभाषाविद असल्याकारणाने त्यांनीविविध धर्मांचा मुलभूत अभ्यास केला होता. अभ्यासाअंती सर्व धर्मात एकेश्वरवादी सिद्धांताचे प्रचलन असल्याच्या निष्कर्षाप्रत ते आले होते.ते स्वतःचाउल्लेख 'हिंदू एकेश्वरी असा करतात.मनुष्य देवता तुल्य आहे (आत्मा वय ब्रह्मः) आणि तो आपल्या सादकर्मांनी उन्नत होऊ शकतो या हिंदूधर्मातील सिद्धांताचा त्यांनी स्वीकार केला त्यांच्या मते धर्म ही विश्वासाची वस्तू असून, सर्व धर्मांचा सार ग्रहण करून कृत्रिम आणि ढोंग असलेल्या बाबी त्यागाव्या अशी त्यांची धारणा होती. कर्मकांड अनुज्ञेय असले तरी ते अनिवार्य नाही हे वैदिक ग्रंथ आणि उपनिषदांच्या साहाय्याने स्पष्ट केले.हिंदूअनेकनिष्ठुर, विषम आणि वेडगळ रूढी आणि आचारांमुळे बौद्धिककदृष्ट्या गुलाम बनला असून, भूतदया आणि परोपकाराच्या सदमार्गापासून दूर गेला आहे. हिंदू समाजाचा उद्धार करण्याची 'तरफ' त्यांना उपनिषदांतील वेदांतात सापडली.त्यामुळेभारतीय सामाजिक आणि धार्मिक व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने त्यांनी सन. १८२८ मध्ये ब्राह्मो समाज स्थापनाची स्थापना केली.

रॉय यांच्या धार्मिक कार्याचे महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे पाश्चिमात्य बुद्धिवादी विचारधारा आणि पौर्वात्य अध्यात्मवादाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. तुहफत-उल-मुवाहिद्दीन या ग्रंथात ते तर्कवादी बुद्धिवादाचे व एकेश्वरवादाचे सूक्ष्म विश्लेषण दिसतात. 'दि प्रिसेप्ट्स ऑफ जेजस' यात ख्रिश्चन धर्माच्या नैतिक सिद्धांताचे वर्णन केले आहे. ईश, केन, मुंडक, कठ, मांडुक्य या उपनिषदांचे बंगालीत भाषांतर करून त्यांचे विश्लेषण व त्यामधील आशयाची बुद्धीयुक्त मांडणी केली.वेदान्तसूत्रावरील शांकरभाष्याचे बंगाली अनुवादही केले. या सर्व ग्रंथांना प्रस्तावना लिहून लोकांना स्व:खर्चानें वाटप केले. ब्रह्मसूत्रभाष्याच्या आधारे 'वेदान्तसार' नावाची छोटी पुस्तका प्रकाशित केले.

त्यांनी परंपरागत धर्मआणि दैवी धर्मात अंतर केला. त्यांच्या मते परंपरागत धर्मात अंधविश्वास आणि तार्किक विसंगतीची शक्यता असते मात्र दैवी धर्मात अशी कोणतीही बाब नाही. दैवी धर्मात असलेला ईश्वर हा संपूर्ण ब्रह्मांडाला नियंत्रित करतो अशी त्यांची मान्यता होती.श्रवण, मनन, नित्यसन यात्रयसूत्रीचा अनुपालनातून मनुष्य ईश्वराशी संबंध स्थापित रॉय यांनी सांगितले की,भारतीय धर्मग्रंथात अंतरात्म्याची स्वातंत्र्याची (freedom of spirit) संकल्पना असून ती पाश्चिमात्य बुद्धिवादी दृष्टिकोनाशी साम्य दर्शविणारी आहे.रॉय हे धार्मिक स्वतंत्रता आणि सहिष्णुततेचे पुजारी होते. सर्व धर्मांतील मुलभूत एकता आणि सत्यावर त्यांचा विश्वास होता. वेदान्त,कुराण आणिबायबलच्या आधारे हिंदू मुस्लीम आणि ख्रिश्चनांनीआपापला उद्धार करावा. एकेमेकांच्या तत्वज्ञानाची देवाणघेवाण करण्यास एकत्र जमावे, यातच जगाच्या उद्धाराची बीजे त्यांना दिसत होती.धार्मिक सुधारणांच्या बाबतीत प्रत्येक धर्माची सुधारणा धर्म परंपरेत वाढलेल्या मंडळींनीच करावी असे ते म्हणतात.

रॉय यांच्या धार्मिक विचारांचे आणि कार्याचे महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी धर्माच्या सार असलेल्या बाबींचा स्वीकार आणि धर्माच्या असार असलेल्या बाबींचा अस्वीकार केला. दुसरे म्हणजे धार्मिक आणि नैतिक चिंतनासाठी बुद्धिवादी विधायक दृष्टीकोनाचा स्वीकार केला.रॉय यांनी हिंदू धर्माप्रमाणेच ख्रिश्चन आणि इस्लाम धर्माची चिकित्सा केली त्यांनी येशू ख्रिस्ताच्या शिकवणीची प्रशंसा केली असली तरी त्यांच्या दैवत्वावर टीकाही केली. येशूला देव व परमेश्वराचा प्रत्यक्ष पुत्र मानण्यास नकार दिला. तसेच हिंदू वेदांतावर टीका करणाऱ्या आणि ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतल्यासच उद्धार होईल असे म्हणणाऱ्या मिशनरी यांचा प्रतिवाद केला.इस्लाम धर्मातील मधील अनन्यतेवर टीका केली. त्यांच्या मते यामुळे अभिमंत्रित (blessed) आणि अभिशापित (cursed) असे मनुष्याचे विभाजन होते. इस्लामच्या धारणेनुसार अभिमंत्रित ईश्वरी एकतेवर विश्वास ठेऊन मोहम्मद पैगंबरराला मानतात; ज्यांना स्वर्ग प्राप्ती होते. अभिशापित म्हणजे आयात न वाचणारे, मोहम्मदाला पैगंबर न मानणारे होत; जेनरकात जातात. रॉय यांच्या मते या मान्यता अंधविश्वासी आहेत. ते अवतारवाद, पैगंबर, ईश्वरी दूत आदी दैवी शक्तीचे आक्षेपक होते.

थोडक्यात, राजा राममोहन रॉय हे धर्म संस्थेकडे चिकित्सात्मक दृष्टीने पाहून त्याचे तुलनात्मक विश्लेषण करतात. सर्व धर्मात सत्य आहे तसे असत्यही आहे, म्हणून कोणत्याही धर्मातील लोकांनी आपलाच धर्म श्रेष्ठ मानू नये व सर्व धर्माशी समबुद्धी ठेवून सार्वत्रिक किंवा विश्वधर्माचा विकास करावा. सर्वांनी सर्व धर्माचा आदर करावा.तसेच कोणाचीही निंदा करू नये असे ते म्हणतात. रॉय यांच्या धर्म चिंतनावर भाष्य करताना मॉनिअर विलियम्स त्यांनातुलनात्मक धर्मशास्त्राचे पहिले खरे अन्वेषक होते. रवींद्र नाथ टागोर म्हणतात की, रॉय यांच्या ह्रदयात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आदी सर्वांसाठी जागा होती. वस्तुतः त्यांची आत्मा भारताची आत्मा होती. टागोरांचे हे म्हणणे अगदी यथार्थ ठरते.

## संदर्भ


१. ग्रोवर बी. एल. व बेल्हेकर एन. के., आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी, नवी दिल्ली, २०१३
२. चंद्र बिपीन, आधुनिक भारत का इतिहास, ओरीयंट ब्लैकस्वान, नई दिल्ली, २०१५
३. चंद्र बिपीन (संपा.), भारत का स्वतंत्रता संघर्ष, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, २०१५
४. ताराचंद, भारतीय स्वतंत्रता आंदोलन का इतिहास, खंड २, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, २००७
५. देसाई ए. आर., भारतीय राष्ट्रवाद की सामाजिक पृष्ठभूमी, मॅकमिलन पब्लिशर्स, दिल्ली, २०१२
६. बंद्योपाध्याय शेखर, पलासी से विभाजन तक और उसके बाद, ओरीयंट ब्लैकस्वान, नई दिल्ली, २०१९
७. राय कोलेश्वर, आधुनिक भारत (१७५७ ते १९५०), किताब महाल, इलाहाबाद, १९८८
८. वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते १८५७), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६
९. वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ ते १९२०), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१७
१०. सरकार सुमित, आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, २०१८
११. सिंह अभय (संपा.), भारत में राष्ट्रवाद, ओरीयंट ब्लैकस्वान, नई दिल्ली, २०१९